# रत्नागिरी, आणि सिंधुदुर्ग जिल्हा: महाराष्ट्र शासनाबरोबरच्या दि. 30 सप्टेंबर 2010 रोजीच्या विचारविनिमयाचा आणि 4 ऑक्टोबर ते 12 ऑक्टोबर 2010 अभ्यास दौऱ्याचा अहवाल

**माधव गाडगीळ**

**अध्यक्ष, पश्चिम घाट परिसर तज्ञ समिती**

## हिरवे तळकोकण

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे हा सारा निसर्गरम्य प्रदेश आहे. माधव केशव काटदऱ्यांनी म्हटले आहे ना: “सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळकोकण। राष्ट्रदेविचे निसर्गनिर्मित केवळ नंदनवन।”. सृष्टीचे वरदान लाभलेल्या ह्या परिसराची मोहक समुद्रकिनारे, आकर्षक डोंगररांगा आणि जोडीस रसाळ आंबे, काजू, फणस, मसाले, नारळ, सुपारी, कोकम ही खासियत आहे. ह्या प्रदेशाच्या पूर्वेला सह्याद्रीच्या रांगा आणि पश्चिमेला अरबी समुद्र आहे. समुद्रावरचे खारे वारे सह्याद्रीला अडून तिथे दरसाल 3000 - 5000 मिमी पाऊस पडतो. ह्या पश्चिम घाटाच्या रांगा सर्व दक्षिण भारताचा जलस्त्रोतच आहेत. महाराष्ट्राच्या सह्याद्रीतून कृष्णा, गोदावरी ह्या मोठया नद्यांचा आणि वाशिष्ठी, सावित्री, शास्त्री अशा अनेक पश्चिमवाहिनी नद्यांचा उगम होतो. जिथे कोकणातल्या नद्या समुद्राला मिळतात तिथल्या खाडया जीवसृष्टीने समृध्द आहेत. त्यांच्या तीरावर कांदळवन फोफावते. इथल्या समुद्राच्या नितळ पाण्यात प्रवाळही वाढतात. ही कांदळवने, डोंगरांवरची सदाहरित जंगले आणि डोंगरमाथ्यांवरचे “रानफुलांनी मंडित” सडे ही ह्या प्रदेशाची वैशिष्टये आहेत. इथल्या सुपीक खोऱ्यात भातशेती आणि नारळ-सुपारीच्या बागा आहेत, तर डोंगर उतारांवर आंबा आणि काजूंची लागवड आहे. खाड्यांत आणि समुद्रकिनाऱ्यावरती भरपूर मत्स्योत्पादन होते. सागरी व डोंगरी किल्ले, अनेक तीर्थक्षेत्रे ह्यांमुळे हा परिसर ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टयाही समृध्द आहे. येथील अर्थव्यवस्था शेती, फलोत्पादन, मासेमारी आणि पर्यटन ह्या चार खांबांवर ठाम उभी आहे. अलीकडे येथे लोटे परिसरातील रासायनिक उद्योग, औष्णिक व वायु आधारित

ऊर्जा उत्पादन, खाणकाम व आता प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्प अशा नवनव्या विकासयोजना कार्यान्वित आहेत. कोकणात शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर आहे. ह्याच कोकणाने देशाला अनेक मान्यवर नेते पुरविले आहेत.

## पश्चिम घाट तज्ञ गट कार्यव्याप्ती

पश्चिम घाट प्रदेशाची पर्यावरणीय संवेदनाशीलता व परिसर संपतीचे महत्व, तसेच अनेक राज्यांत विभागलेली भौगोलिक रचना व हवामानातील बदलांचे संभावित परिणाम लक्षात घेऊन भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने एक पश्चिम घाट परिसर तज्ञ गट गठित केला आहे.

ह्या गटापुढे खालील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत:

1.पश्चिम घाटाच्या परिसराच्या सद्यःस्थितीचे परिशीलन करणे

2.पश्चिम घाटातील कोणकोणत्या टापूंना संवेदनाशील परिसरक्षेत्रे (Ecologically Sensitive Areas) म्हणून घोषित करणे आवश्यक आहे हे ठरवून अशा टापूंना १९८६ च्या पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार संवेदनाशील परिसरक्षेत्रे म्हणून घोषित करण्याची शिफारस करणे. असे करताना तज्ञ गट मोहन राम समितीचा अहवाल, मान्यवर सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे, राष्ट्रीय वन्य जीव मंडळाच्या शिफारसी लक्षात घेईल व राज्य शासनांचा सल्ला विचारात घेईल.

3. सर्व संबंधित राज्यांतील जनता व शासनांशी सर्वंकष विचार विनिमय करून पश्चिम घाट प्रदेशाचे संरक्षण, संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्याबाबत शिफारसी देणे.

4. भारत शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने १९८६ च्या पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार जाहीर केलेल्या पश्चिम घाट प्रदेशातील विवक्षित संवेदनाशील परिसरक्षेत्रांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

5. १९८६ च्या पर्यावरण संरक्षण कायद्याअंतर्गत पश्चिम घाट प्रदेशाच्या परिसराचे सयुक्तिक व्यवस्थापन करण्यासाठी व सर्व संबंधित राज्यांच्या सहकार्याने शाश्वत विकासासाठी प्रयत्न करण्यासाठी एक जाणकार लोकांचे पश्चिम घाट परिसर प्राधिकरण स्थापन करण्यासाठी काय पावले उचलावी ह्याबद्दल शिफारस करणे.

6. पश्चिम घाटाच्या संदर्भातील इतर काहीही सयुक्तिक पर्यावरणीय अथवा जीवपरिसर संबंधित विषयांबाबत, तसेच केन्द्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने वेळोवेळी विचारणा केल्याप्रमाणे सल्ला पुरवणे.

स्थापनेनंतर ह्या मंत्रालयाने तज्ञ गटाला संपूर्ण रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा विचार करण्यास सांगितले आहे.

तज्ञ गटाच्या कार्यव्याप्तीत सुचवल्याप्रमाणे लोकांबरोबर आणि शासकीय यंत्रणेबरोबर सविस्तर विचार विनिमय करून पश्चिम घाट प्रदेशाचे संरक्षण, संगोपन व पुनरुज्जीवनासाठी शिफारसी करणे अपेक्षित आहे. ह्या उद्दिष्टांप्रमाणे 30 सप्टेंबर 2010 रोजी मुंबई येथे महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांबरोबर विचार विनिमय करून माधव गाडगीळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी 4 ते 12 ऑक्टोबर दरम्यान रत्नागिरी, सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्ह्यांचा अभ्यास दौरा केला. ह्या दौऱ्यादरम्याने विविध संस्थांना भेटी दिल्या, तसेच अनेक उद्योजक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व स्थानिक समाजातील लोकांशी चर्चा केली. ह्या सर्व दौऱ्यादरम्यान राज्य प्रदूषण मंडळाचे अधिकारी सोबत होते. तसेच रत्नागिरीच्या जिल्हा अधिकाऱ्यांच्या कार्यालयात जिल्हा पातळीवर अनेक अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. अत एव, ह्या अहवालातील निरीक्षणे ही संबंधित शसकीय अधिकाऱ्यांबरोबर पडताळून पाहण्यात आली आहेत.

पर्यावरणाचे संरक्षण, व लोककल्याण ही आपल्या प्रजासत्ताक राष्ट्राची महत्वाची उद्दिष्टे आहेत. ह्यासाठी घटनेतील मूलभूत हक्क, ७३ व ७४ व्या घटना दुरुस्त्या, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, जैवविविधता कायदा २००२, माहिती हक्क कायदा २००६ अशा अनेक तरतुदींद्वारे एक सुव्यवस्थित चौकट रचली गेली आहे. परंतु प्रत्यक्षात ह्या साऱ्याची अंमलबजावणी कितपत होत आहे हे तपासून पाहणे अत्यावश्यक आहे. म्हणून ह्या अहवालात खालील विषयांवर लक्ष केंद्रित केले आहे.

1. पर्यावरणाचे रक्षण प्रभावीपणे केले जात आहे का?
2. पर्यावरणाची होत असलेली हानी स्वीकारार्ह आहे काय?
3. पर्यावरणाच्या हानीची होत असलेली विभागणी (वेगवेगळया प्रभागांत, वेगवेगळया प्रदेशांत, वेगवेगळया वर्गांत, आजच्या व पुढील पिढ्यांत) स्वीकारार्ह आहे काय?

4. पर्यावरणाच्या व्यवस्थापनात स्थानिक लोकांना नीट सहभागी करून घेतले जात आहे काय?

5. सुयोग्य विकास मार्ग ठरविण्यात स्थानिक लोकांना नीट सहभागी करून घेतले आहे काय?

6. आजच्या विकास नीतीतून शाश्वत विकासाकडे वाटचाल होत आहे काय?

7. सत्ताधाऱ्यांना जमिनीवर काय चालू आहे ह्याची जाणीव आहे काय?

8. लोकांचे नागरी हक्क जपले जात आहेत काय?

## पर्यावरणाचे रक्षण प्रभावीपणे केले जात आहे काय?

ह्याचे उत्तर स्पष्टपणे पर्यावरणाचे नीट रक्षण होत नाही हेच आहे. प्रदूषण नियंत्रण आणि इतर कायद्यांची अंमलबजावणी असमाधानकारक आहे. प्रत्यक्षात काय चालले आहे ह्यावरची देखरेख फारच तुटपुंजी आहे आणि लोकांच्या तक्रारी निवारण्याची यंत्रणा कुचकामी आहे.

आपण या संदर्भात लोटयाच्या चिपळूण जवळील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील (एम.आय.डी.सी.) रासायनिक उद्योगांचे उदाहरण घेऊ या. आम्ही तिथल्या स्थानिक अभ्यासगटाशी चर्चा केली. इथली सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची सामुदायिक यंत्रणाही (Common Effluent Treatment Plant) पाहिली. शिवाय दाभोळ खाडीच्या भेटीदरम्यान अनेक लोकांशी बोलणी झाली. तेव्हा असे लक्षात आले की शासकीय अधिकाऱ्यांनी मुंबईत झालेल्या बैठकीत अनेक चुकीच्या गोष्टी सांगितल्या होत्या. एक तर, लोटेचा अभ्यासगट आज पूर्णपणे निष्क्रिय आहे. गेल्या दोन वर्षांत ह्या अभ्यासगटाची एकही बैठक झालेली नाही. कोतवली गाव भरपूर प्रदूषणाला सामोरे जात आहे. तेथील ग्रामस्थांनी वेळोवेळी मागणी करूनही त्यांच्या सभासदाला अभ्यासगटात स्थान देण्यात आलेले नाही.

लोटयामध्ये हे नक्की की कारखान्यांतून निर्माण होणाऱ्या हवेच्या व पाण्याच्या भयंकर प्रदूषणावर व्यवस्थित व पुरेशी कारवाई होत नाही आहे, आणि जी उपाययोजना राबवली जाते ती दोषपूर्ण आहे. आम्ही स्वतः तिथे मोठया प्रमाणावर दूषित पाण्याचा विसर्ग ओढयात जात असलेला पाहिला आहे. आता

याच ओढयाचे पाणी कोतवली गाव पिण्यासाठी वापरते. गावचे सरपंच हे सारे भोगून व आता ही परिस्थिती आटोक्यात आणता येणार नाही हे जाणून हेच पाणी पिऊन आत्महत्येच्या प्रयत्नापर्यंत पोचले. मग धावपळ करून त्यांना मुंबईच्या इस्पितळात नेण्यात आले. त्यांचा जीव वाचवला एवढेच, परंतु अजूनही तिथे कोतवलीच्या पाण्याच्या प्रदूषणावर कोणतीही परिणामकारक उपाययोजना करण्यात आलेली नाही. तसेच 2000 साली ह्याच लोटे - एम.आय.डी.सी. च्या परिसरात राहणारे सुमारे 30 शालेय विद्यार्थी प्रदूषित वायूमुळे बेशुध्द पडले होते. कंपनीने यासंबंधी कोणतीही दखल घेतली नाही, शिवाय ह्या मुलांना इस्पितळात नेण्याची साधी व्यवस्था करण्याचे भानही दाखवले नाही. आजूबाजूच्या लोकांनी सांगितले की, ह्या परिसरातून बाहेर सोडला जाणारा विषारी घन कचरा (Solid toxic sludge) मातीत मिसळून टाकला जातो किंवा घाटाच्या परिसरात नेऊन फेकला जातो. अशा कित्येक अपराधांची नोंद आहे, पण कोणालाही पकडण्यात आलेले नाही.

आता हेही पक्के कळले आहे की लोटे येथील अनेक रासायनिक उद्योग त्यांचे विषारी सांडपाणी भूजलात सोडताहेत. त्यासाठी बोअरवेलचा वापरही केला जातो आहे. अशा तीन घटना प्रकाशात आल्या, पण त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. काही व्यक्तींनी तर असे विषारी सांडपाणी टँकरमध्ये भरून घेऊन बोरज धरणामध्ये टाकले. आता याच बोरज धरणातून साऱ्या खेड शहराला पाणी पुरवठा होतो. ह्या अघोरी प्रकारामुळे खेडला होणारा पाणीपुरवठा काही काळ बंद ठेवावा लागला. लोटेमधील रासायनिक प्रदूषणामुळे दाभोळ खाडीतील माश्यांची संख्या घटते आहे आणि मत्स्य उद्योगातील रोजगारही घटत आहे.

अशी दुर्दशा आहे, तर याला प्रतिसाद म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमके काय केले, तर स्वतःचे ऑफिस लोटयातून हलवून चिपळूणला नेले! एका बाजूला इथे असह्य प्रदूषण आजच आहे हे सर्वमान्य आहे, तरीही आम्हाला तेथील एम.आय.डी.सी. अधिकाऱ्याने सांगितले की आता इथेच 550 हेक्टर जमिनीवर एक नवा पेट्रोकेमिकलचा कारखानदारी प्रकल्प होण्याचा प्रस्ताव आहे.

खाणकामाच्या संदर्भात असेच वाईट अनुभव आहेत. आशापुरा खाणकाम कंपनीने उंबरशेतला कोणत्याही परवानगीशिवाय तथाकथित चाचणी खड्डे घेतले आहेत. खरे तर इथे मोठ्या प्रमाणावर खुदाईच

चालू आहे. या संदर्भात शासकीय अधिकाऱ्यांना कसल्या चाचणीला परवानगी असते हे सांगा अशी विनंती केली, पण नीट माहिती मिळू शकलेली नाही. आशापुराचीच आणखी एक खाण साखरी वेळासला आहे. खनिज अधिकारी श्री. भोगे यांच्याशी ह्याविषयी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये चर्चा केली असता त्यांनी सांगितले की साखरी वेळास खाणीची पर्यावरणीय परवानगी नोव्हेंबर 2009 मध्ये संपली आहे. तर जानेवारी 2010 ला वाहतूक परवानगीही थांबवलेली आहे. तरीही ग्रामस्थांच्या सांगण्यानुसार कंपनीमार्फत खाणकाम चालूच ठेवले आहे. तसेच परवानगीच्या काळातही मंजुरीपेक्षा कितीतरी पटीने खोदकाम करून खनिजे काढली आहेत. शेजारच्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये राखीव वनांच्या परिसरात, वन खात्याच्या मंजुरीशिवाय खाणकाम चालू असल्याचे पुरावेही आमच्यासमोर मंडण्यात आले.

मध्यंतरी बंद पडलेला एन्रॉनचा ऊर्जा प्रकल्प आता रत्नागिरी गॅस व पॉवर (RGPPL) ने नैसर्गिक वायूच्या आधारे सुरू केला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार हा पूर्णपणे प्रदूषणविरहित प्रकल्प असणार आहे. पण ह्या कारखान्याचे पाणी थंड करण्याचे मनोरे दोषपूर्ण आहेत; व त्यामुळे काही विषारी रसायनांचा निचरा होऊन कातळवाडी ग्रामपंचायतीतील नैसर्गिक झऱ्यांत व विहीरींत ही प्रदूषके पसरत चालली आहेत. तसेच रत्नागिरीतील कोळशावर आधारित ऊर्जा प्रकल्पांत जळलेल्या कोळशाची भुकटी (Fly Ash) अतिशय असमाधानकारक पध्दतीने निकालात काढली जाते आहे. ह्या भुकटीचा वापर सिमेंट, विटा बनवणे इ. साठी करावा असे बंधन आहे. परंतु कोकणात बांधकामाला उपयुक्त असा जांभा दगड भरपूर आहे, आणि विटांना काहीच मागणी नाही. ह्या जिल्ह्यातील एकमेव सिमेंट कारखान्यात तयार होणाऱ्या भुकटीच्या अतिशय नगण्य हिस्सा माल म्हणून वापरला जाऊ शकतो. शिवाय सिमेंटसाठी वापर करताना भुकटीच्या विशिष्ट दर्जाची आवश्यकता असते. तशी भुकटी नसेल तर तिचा काही उपयोग होऊ शकत नाही. मग अशी भुकटी खाणींत (mines) टाकण्यास परवानगी आहे असे समर्थन देऊन ती जांभ्याच्या चिऱ्यांच्या खाणीत (stone quarry) आणून टाकली जात आहे. पण चिरा हा इतका सच्छिद्र असतो की भुकटीतील क्षार व प्रदूषके पाण्यात विरघळून ओहळ, नाले यामार्फत प्राणी व मानवापर्यंत पोचले की त्याचे गंभीर परिणाम

दृष्टीस येतील अशी भीती आहे. भुकटीची अशी विल्हेवाट लावणे आज तात्पुरते थांबले असले तरी मूळ प्रश्न सुटलेला नाही. तरी ह्या बाबतचे योग्य ते शासकीय आदेश तातडीने देणे आवश्यक आहे.

## पर्यावरणाची हानी स्वीकारार्ह आहे काय?

पर्यावरणीय प्रभावाच्या परीक्षणाची (Environmental Impact Assessment: EIA) तरतूद ही पर्यावरणाच्या संरक्षणाच्या दृष्टीने फार महत्वाची आहे. ह्या परीक्षणाअंतर्गत पर्यावरणीय, सामाजिक व आर्थिक फ़ायदे-तोट्यांचा ताळमेळ पारखला जाईल, व फायद्याचे पारडे पुरेसे जड असलेले प्रकल्पच स्वीकारले जातील अशी अपेक्षा आहे. परंतु जवळजवळ सर्व ठिकाणी हे परीक्षण अतिशय सदोष असल्याचे नजरेस येते. अशा बहुतांश परीक्षणांत अतिशय महत्वाच्या गोष्टींकडे सोईस्कर रीत्या दुर्लक्ष केले जाते. उदाहरणार्थ, वीजवाहक तारांच्या जंजाळाचा पर्यावरणावर होणारा परिणाम. ऊर्जाउत्पत्ती वाढू लागली की ऊर्जावहनाकरता वीजवाहक तारा न्याव्या लागतात. त्यांचे मनोरे उभे करताना खालची जमीन व्यापली जाते; शिवाय तिथल्या बागायतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. अशा हानीकडे कानाडोळा करून कसे चालेल? पावसाळ्यात रानफुलांनी सजणाऱ्या कोकणच्या डोंगरमाथ्यावरील सड्यांकडेही असेच दुर्लक्ष केले जाते. हे सडे व त्यांच्या आजूबाजूच्या दऱ्या यातूनच खालच्या खोऱ्यांचा जीवनाधार असलेल्या झऱ्यांचा उगम होतो. त्यांवर वैशिष्ठ्यपूर्ण वनस्पती संपदा असते. भारतीय वनस्पति सर्वेक्षणाचे संचालक डॉ. संजाप्पा यांच्या मते देशात दुसरीकडे कोठेही एवढ्या मर्यादित भूप्रदेशांत इतक्या मोठ्या प्रमाणात केवळ आपल्या देशात आढळणाऱ्या आणि दुर्मीळ वनस्पति प्रजाती सापडत नाहीत. पूर्ण दुर्लक्षित अशी दुसरी जैविक संपदा म्हणजे शिंपले. ह्या शिंपल्यांची उत्तम पैदास कोकणच्या खाड्यांच्या चिखलाट मोड्यांवर होते. अशाच एका कारवार जिल्ह्यामधील अघनाशिनी नदीच्या अजून सुस्थितीत असलेल्या खाडीचा अभ्यास केल्यावर मोड्यावरच्या शिंपल्यांच्या वार्षिक उत्पादनाचे मोल साडेपाच कोटी रुपये आहे असे आढळून आले. पर्यावरणीय प्रभावाची अत्यंत दोषपूर्ण परीक्षणे सादर केली जाणे, व ती पर्यावरणीय मूल्यांकन समित्यांकडून(Environmental Appraisal Committee) मान्य केली जाणे, ह्यांमुळे आपण पर्यावरणाची अस्वीकार्य पातळीवरची हानी होऊ देत आहोत.

३ जानेवारी २०११

जर पर्यावरणाची हानी मर्यादेत ठेवायची असेल तर जमिनीचा सुयोग्य वापर करण्याची नितांत गरज आहे. यासाठी जमिनीची क्षमता, तिची सहनशक्ती व तिचा वापर ह्याचा व्यवस्थित ताळमेळ राखला पाहिजे. चांगल्या सुपीक, अथवा पर्यावरणाच्या दृष्टीने मौलिक जमिनीवर गदा आणून त्यावर प्रकल्प उभे करण्यापेक्षा टाकाऊ जमिनीवर कारखानदारी उभारली गेली पाहिजे. असे करताना की जिथे कारखाने उभे राहणार आहेत, तिथे निर्माण होणारे प्रदूषण आटोक्यात राहणार आहे की नाही, हेही पाहणे जरुरीचे आहे. या सर्व गोष्टींचा मुद्देसूद विचार करून राज्य व केंद्र सरकारने बऱ्याच कष्टाने, तांत्रिक माहितीच्या आधारे विविध निकष विचारात घेऊन, दोन महत्वाचे दस्तावेज बनवले आहेत.

1) रत्नागिरी प्रादेशिक विकास आराखडा (Ratnagiri Regional Development Plan-RRDP)
2) रत्नागिरी जिल्ह्यासाठी उद्योगांची सुयोग्य स्थलनिश्चिति दर्शविणारे मानचित्र (Ratnagiri Zonal Atlas for Siting of Industries-RZASI)

पण आज काळजीपूर्वक तयार केलेल्या ह्या दोनही अहवालांतील शिफारसी झुगारून दिल्या जात आहेत; व ह्यातून खात्रीने पर्यावरणाची मोठी हानी होत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यासाठी उद्योगांची सुयोग्य स्थलनिश्चिति दर्शविणारे मानचित्र रचताना वेगवेगळया प्रकल्पांचे पर्यावरणावर होणारे परिणाम साठत जाऊन त्यातून कसे व्यापक परिणाम (Cumulative Impact) होऊ शकतील याचा साकल्याने विचार केला गेला आहे. अर्थात् ह्या मानचित्रातही काही महत्वाच्या त्रुटी आहेत. उदाहरणार्थ, जीवजातींच्या अधिवासांत सलगता टिकवणे महत्वाचे आहे; अधिवासांचे तुकडे तुकडे झाल्यास मोठी हानी होऊ शकते हे लक्षात घेतले गेलेले नाही. परंतु जिल्ह्याच्या धारणाशक्तीचा (Carrying Capacity) असा सर्वांगीण विचार अत्यावश्यक आहे, व त्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल आहे. ह्या अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष करणे फार चुकीचे आहे.

मानवी हस्तक्षेपांचा पर्यावरणावर काय परिणाम होईल हे नीट समजण्यात अजूनही खूप अडचणी आहेत. उदाहरणार्थ, कोळसा जाळताना निघणाऱ्या $SO_2$ व $No_X$ ह्या वायूंचा आंबा व काजू उत्पादनावर नक्की कसा व काय परिणाम होतो ह्याचा समज अगदी अपुरा आहे. ह्या संदर्भात सध्या उपलब्ध असलेले सर्व शास्त्रीय अभ्यास केवळ थंड प्रदेशातील हंगामी पिकांपुरतेच मर्यादित आहेत, यांतून फार काही अंदाज

बांधणे अवघड आहे. शिवाय झंजावाती वाऱ्यांच्या व मुसळधार पावसाच्या ह्या प्रदेशात काही वेगळेच प्रभाव अवतरणे अशक्य नाही. कोकण कृषी विद्यापीठाने ह्या दिशेने काही प्रयोग हाती घेतले आहेत. पण ते पुरेशी व नेटकी माहिती देणार नाहीत. राहून राहून आश्चर्य ह्या गोष्टीचे वाटते की कोकण कृषी विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या डहाणू परिसरात कोळशावर आधारित ऊर्जा प्रकल्पाची समस्या अनेक वर्षे भेडसावत असून, तेथील चिकू बागायतदारांची याबाबत तक्रार असून, तेथे विद्यापीठाचे संशोधन केन्द्र असून, त्यांनी ह्या विषयाचा काहीही अभ्यास आजतागायत केला कसा नाही? ते असो, आज जिंदाल कंपनीच्या विद्यमाने सुरू केलेला अभ्यास हा अतिशय सदोष आहे: उदाहरणार्थ, अभ्यासासाठी घेतलेला तुटपुंजा नमुना, व अभ्यासासाठी निवडलेला मर्यादित काळ. शिवाय पावसाळयात हे संशोधन पूर्णपणे बंद ठेवले जाते. म्हणजे पाण्यात विषारी वायू विरघळून त्यांचा काही परिणाम होत असल्यास- आणि असा निश्चितच होत असेल- त्याबद्दल काहीही उकल होत नाही. एकूण आपले आज असलेले अज्ञान आणि फार मर्यादित असे नवे संशोधन पाहता ह्या संदर्भात अतिशय काळजीपूर्वक पावले उचलण्याची जरुरी आहे. एकूण सद्यःस्थितीत ह्या बागायत आणि वनसमृध्दीने संपन्न जिल्ह्यात हवेचे प्रदूषण टाळणे हेच श्रेयस्कर वाटते.

## पर्यावरणाच्या हानीची आज होत असलेली विभागणी (अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळया क्षेत्रांत, वेगवेगळया भौगोलिक प्रदेशांत, वेगवेगळया वर्गांत, आजच्या व पुढील पिढ्यांत) ग्राह्य आहे काय?

### *ग्रामीण - नागरी समाजातील दरी*

भारतातील विद्यमान विकास प्रक्रिया ही नेहमीच नागरी गरजांना, नगरवासियंच्या प्रश्नांना झुकतं माप देत आली आहे, आणि मग त्याचाच परिपाक म्हणून अविकसित प्रभाग मागासलेलेच रहात गेले आहेत. कायमच शेतीचा विकास दर हा संघटित उद्योग व सेवा क्षेत्रांहून खूप कमी आहे. शिवाय संघटित क्षेत्रांत काही खास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही आहे, ती रोजगार निर्मिती लोकसंख्यावाढीला तोंड देऊ शकत नाही आहे, व ग्रामीण बेरोजगारीची समस्या भेडसावत आहे. दुर्दैवाने ह्या परिस्थितीच्या

अतिरेकी ताणामुळे आज महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचा अखेरी मार्गसुद्धा स्वीकारत आहेत. या परिस्थितीत याच शेतकरी वर्गावर, बागायतदारांवर, मच्छिमारांवर आणि पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण जनतेवर पर्यावरणाच्या नासाडीचा भार लादणे हे निश्चितच न्याय्य नव्हे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा ह्या विचारधारणेतून वेगळा विचार करणे अत्यावश्यक आहे.

पण आज हेच, अनुचित तेच, होत आहे. गेल्या काही दशकांत मोठ्या प्रमाणात आंबा व काजूंच्या लागवडीला उत्तेजन देण्यात आले आहे, आणि त्यातून एक समर्थ अर्थव्यवस्था उभारली गेली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजेनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया कमजोर वर्गाच्या जमिनींवरही मुबलक प्रमाणात काजूची लागवड केली गेली आहे. ह्याच आंबा - काजू बागा कदाचित या पुढे हवेच्या प्रदूषणाला फार मोठया प्रमाणात बळी पडतील असा मोठा धोका आहे. सध्या चालू असलेले तुटपुंजे संशोधन हे असे होणार नाही असे आश्वासन देण्यास असमर्थ आहे. शिवाय ही दोन्ही पिके परकीय चलनप्राप्तीसाठी अतीमहत्वाची आहेत. नुकतीच जगभरची बाजारपेठ आपल्या रसाळ हापूस आंब्यासाठी खुली केली गेली आहे. त्यासाठी गरजेचे असणारे Global GAP Certification प्रमाणपत्र तेथील 80 शेतकऱ्यांनी मिळवले आहे; इतर अनेक शेतकऱ्यांचे हे प्रमाणपत्र येऊ घातले आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने ही प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी सबसिडीही देऊ केली आहे. परंतु, जर अशा फळबागांजवळ हवा प्रदूषण करणारे कारखाने उभारले जातील, तर त्यांची निर्यात पात्रता ताबडतोब रद्द होईल.

मच्छिमारी हा असाच, लोकांच्या उदरनिर्वाहाच्या आणि पोषणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा व्यवसाय आज दिवसागणिक क्षीण होत आहे. ह्यामागे [१] अनियंत्रित प्रदूषण, [२] मासेमारीसाठी हव्या त्या ठिकाणांना पोचण्यास येणारे अडथळे, व [३] मासेमारीसाठी हवे तेवढे धक्के उपलब्ध नसणे, ही महत्वाची कारणे आहेत. पण याबाबत काहीही उपाययोजना करण्यात येत नाही आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या सावंत समितीने मासेमारीच्या बंदरांच्या विकासाचा आराखडा मांडला आहे, पण तो बाजूला सारून कारखान्यांना मात्र कोळसा उतरवायला लगेच धक्के बांधायची परवानगी मिळतेय. अशा धक्क्यांच्या आसपास मच्छिमारांना प्रवेश दिला जात नाही. ह्याचेच एक डोळयात भरण्याजोगे उदाहरण म्हणजे

फिनोलेक्स ह्या कंपनीने न्यायालयाकडून मिळवलेला मच्छिमारांसाठीच्या गोळप-रनपारच्या धक्क्याविरुद्धचा स्थगितीचा आदेश.

कोकणचा निसर्ग मनमोहक आहे. त्यामुळे पर्यटन इथे आता खरोखर फुलते आहे. उदाहरणार्थ, गणपतीपुळयाच्या प्रसिध्द प्राचीन गणपतीला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या २००८-०९ मध्ये १६ लक्ष ७० हजारांवर गेली आहे. पण हेच पर्यटक आता नव्याने तिथे डोकावणाऱ्या, कोळशाचा धूर ओकणाऱ्या वीज प्रकल्पाच्या चिमण्यांमुळे दूर लोटले जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

### *प्रादेशिक असंतुलन*

देशाच्या काही मर्यादित प्रदेशांत विकासाची घोडदौड होत असताना इतर अनेक टापू अविकसित राहणे हे आपल्या विकास प्रक्रियेतील एक महत्वाचे वैगुण्य आहे. म्हणून कोणत्याही प्रदेशाचा विकास स्थानिक शक्तिस्थलांवर लक्ष केन्द्रित करून व्हावा; केवळ पुढारलेल्या प्रदेशांच्या विकासाला आणखीच हातभार लावण्याकडे मागासलेल्या प्रदेशांची विकास प्रक्रिया झुकू देऊ नये, हेच सयुक्तिक ठरेल. तेव्हा रत्नागिरी- सिंधुदुर्गाच्या ऊर्जा स्रोतांचा, खनिजांचा विकास हा अग्रक्रमाने स्थानिक गरजा विचारात घेऊन केला जावा. ह्या जिल्ह्यांची आजची ऊर्जेची वार्षिक गरज १८० मेगावॉट आहे, तर उत्पादन आहे ४८४३ मेगावॉट (कोयना 2000 MW, RGPPL 2200 MW, Finolex 43 MW, JSW 600 MW, आणि इतर 600 MW उत्पादन पुढील २-३ महिन्यात सुरू होईल). तेव्हा हे जिल्हे स्वतःची गरज भागवून, वर देशासाठी भरपूर ऊर्जा उत्पादन करत आहेत. मग जर मुंबईची ऊर्जेची भूक भागत नसेल, तर मुंबईकरांनी आज रत्नागिरीतल्या जिंदालच्या कारखान्याच्या जागेसारखीच रचना असलेल्या मलबार हिलवर एक राक्षसी कोळसा जाळणारा विद्युत्प्रकल्प बांधावा, आणि त्याच्या भूसंपादनाची आणि प्रदूषणाची कळ सोसावी असे सुचवले तर त्यात गैर काय आहे? आणि ह्यातून एक दुसरा मोठा फायदा हा होईल की लांबून वीज आणण्यात तारांच्या जाळयावर जो अफाट खर्च होतो, जी भरमसाठ वीजगळती होते, ती टाळता येईल.

विकास प्रक्रियेतून रोजगाराची निर्मिती होते हा मोठा जिव्हाळयाचा विषय आहे. पण प्रत्यक्षात काय होते आहे? लोटेच्या रासायनिक उद्योगांत १०-१२ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे. पण जोडीला प्रदूषणाने दाभोळच्या खाडीतल्या अनेक मत्स्य व्यावसायिकांचा रोजगार बुडाला आहे. ह्याचा

काळजीपूर्वक अभ्यास व्हायला पाहिजे; पण सुमारे १० ते २० हजार लोकांचा रोजगार नष्ट झाला आहे असा अंदाज आहे.

*आर्थिक विषमतेची समस्या*

भारताच्या गतिमान् आर्थिक विकासाबरोबरच आर्थिक विषमतेची समस्या बळावत आहे. एका पारड्यात आहे अब्जाधीशांचा वाढती संख्या, आणि दुसऱ्या पारड्यात दारिद्र्य रेषेखालील त्रेचाळीस कोटींहूनही जास्त जनता. तेव्हा कोणत्याही विकास प्रक्रियेत तळा-गाळातल्या लोकांना अधिकच कळ सोसावी लागणे हे सर्वथैव अनुचित आहे. पण रत्नागिरी- सिंधुदुर्गात हेच होते आहे असे अनेक पुरावे आहेत. उदाहरणार्थ, अनेकदा खाणीतील राडा रोडा शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीत घुसतो. कळण्याच्या स.नं. ५७१५ व ६० च्या मानसिंह देसाई, आत्माराम देसाई,सदाशिव देसाई व सुनीत साळगावकर ह्यांच्या शेत जमिनीवर असा उपद्रव असल्याची तक्रार आहे. तसेच उंबरशेतच्या आशापुरा खाणीने एका शेतकऱ्याच्या जमिनीवर बळजोरीने खुदाई सुरू केल्याची बातमी आहे. ह्या खाणी इतरही अनेक बेकायदेशीर गोष्टी करत आहेत: मोठ्या प्रमाणात स्फोटकांचा वापर, परवानगीशिवाय रस्ते बांधणे, खुदाई झाल्यावर जमीन पुनरुज्जीवित न करणे. मासेमारी व्यवसायातील समाजाला पोचत असलेल्या झळीचे वर्णन वर केलेच आहे.

*पिढ्या- पिढ्यांतील दरी*

असे म्हणतात की आपण पुढच्या पिढीसाठी निसर्ग संपत्तीचे विश्वस्त आहोत. ती न घटवता त्यांच्या ताब्यात देणे हे आपले कर्तव्य आहे. तेव्हा कोणताही हस्तक्षेप करताना तेथील पर्यावरणाला कमीत कमी धोका पोहोचेल हेच पाहणे रास्त ठरेल. यासाठी पेंडसे - कद्रेकर समिती अहवाल तपासणे उपयुक्त ठरेल. त्यांनी सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म जल विद्युतप्रकल्पांचा रत्नागिरीसाठी अभ्यास केला व कोकणातले 30% पाणी वापरून 2000 मेगावॅट पर्यंत वीजनिर्मिती होऊ शकते असे दाखवून दिले आहे. अशा विकेंद्रित ऊर्जानिर्मितीचे अनेक फायदे आहेत. यातून पर्यटन, मासेमारी व इतर छोटे उद्योग पोसले जाऊ शकतील. अत एव वीजनिर्मितीत वाढ करताना पर्यावरणाचे संवर्धन करणेही शक्य आहे असे दिसते. असेच दुसरे एक उदाहरण गद्रे फुड, रत्नागिरी ह्या उद्योगात पहायला मिळते. इथे माशांच्या टाकाऊ अवशेषांपासून मीथेन

गॅसच्या स्वरूपात ऊर्जा व जोडीने खत बनवले जाते. या धर्तीवर रत्नागिरीतील अनेक आंबा, कोकम, काजू, मासे, तिसऱ्य, कोळंबी व इतर अन्नप्रक्रिया उद्योग ऊर्जानिर्मितीला हातभार लावू शकतील.

आज तंत्रज्ञानाची घोडदौड सुरू आहे. पण सगळीच तंत्रज्ञाने सारख्याच वेगाने प्रगत होत आहेत असे बिलकुल नाही. उदाहरणार्थ, सौर ऊर्जेची प्रगती अणुऊर्जेहून खूपच वेगाने होत आहे, आणि काही वर्षांतच सौर ऊर्जा अणु ऊर्जेहून सर्व दृष्ट्या अधिक ग्राह्य ठरेल अशी दाट शक्यता आहे. असे असताना, आणि विशेषतः स्थानिक लोकांचा अनेक प्रकारे विरोध असताना अणु ऊर्जेला पुढे ढकलण्याऐवजी जरा धीर धरणे विवेकाचे ठरेल असे वाटते.

## पर्यावरणाच्या व्यवस्थापनात स्थानिक लोकांना नीट सहभागी करून घेतले जात आहे काय?

जगभरातील अनुभव असा आहे की पर्यावरण रक्षणासाठी झालेल्या चळवळी लोकांमुळेच झाल्या आहेत, शासनाने अथवा उद्योगपतींनी यात कोणत्याही देशात, कधीच पुढाकार घेतल्याचे उदाहरण नाही. निसर्ग संवर्धनाच्या परंपरा तर भारतीय संस्कृतीचे एक महत्वाचे अंग आहेत; उदाहरणार्थ, पश्चिम घाटावर जिकडे तिकडे देवरायांच्या रूपात वनराजीचे जतन केले गेले आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग –कोल्हापुरांतही अनेक लक्षणीय देवराया आहेत; उदाहरणार्थ दापोलीतल्या पंढरी-गुडघेच्या 40 हेक्टरच्या आदिम अरण्यातील 9 हेक्टरचा भाग देवराईचा आहे. तसेच, दापोली तालुक्यातील खाजगी मालकीच्या टेकडयांवर चांगली जंगलं टिकून आहेत; पण कोठेही सरकारी दफ्तरात अथवा अधिकृत प्रकाशनांत यांचा उल्लेख केला जात नाही.

एकूण पर्यावरण संरक्षण, व्यवस्थापन आणि देखरेख यांमध्ये लोकांचा सहभाग असणे अतिशय महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन १९९०च्या दशकात पर्यावरण आणि वन मंत्रालयाने “पर्यावरण वाहिनी” ही जिल्हास्तरीय योजना अंमलात आणली होती. या योजनेच्या अंतर्गत निवडक जागरूक नागरिकांना प्रदूषण, वृक्षतोड अशा पर्यावरणीय समस्यांची तपासणी करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले होते. जिल्हाधिकारी त्यांच्या निरीक्षणांच्या आधारे पुढील चौकशी व कारवाई करत असत. ही योजना कर्नाटकाच्या दक्षिण कन्नडसारख्या जिल्ह्यांमध्ये खूप प्रभावी ठरली होती. पर्यावरण आणि वन खात्याच्या

11 व्या पंचवार्षिक योजनेवरील सुकाणू समितीने ही योजना पुन्हा सुरू करावी आणि सर्व प्रकारे नागरिकांना सहभागी करून घ्यावे अशी शिफारसही केली होती.

ह्या अनुषंगाने मी 30 सप्टेंबर 2010 रोजी महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांबरोबर मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये पर्यावरणावरील देखरेखीमध्ये लोकांचा सहभाग किती आहे याबाबत विचारणा केली. मला असे सांगण्यात आले की, रत्नागिरी जिल्हा पर्यावरणीय समिती रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अशा स्वरूपाचे काम करत आहे. याशिवाय लोटे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंतर्गत असणारा लोटे अभ्यास गट देखील सक्रिय आहे.

मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मदतीने लोटे अभ्यास गट तसेच रत्नागिरी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधला. 5 ऑक्टोबर रोजी लोटे अभ्यास गटाबरोबर माझी बैठक झाली. या बैठकीत असे नजरेस आले की, लोटे अभ्यास गट 2006 मध्ये स्थापन होऊन सुध्दा आत्तापर्यंत या गटाच्या फक्त दोन बैठका झाल्या आहेत, त्यातील शेवटची बैठक 2 वर्षांपूर्वी म्हणजेच 2008 मध्ये झाली आहे. ह्या अभ्यास गटाने सांडपाणी सोडण्याबाबत काही नियम केले होते, परंतु त्यांचे पालन झालेले नाही. काही कारखान्यांतून विषारी पदार्थ बोअरवेल मधून भूगर्भीय पाणी साठयात सोडले जात असल्याचे या गटाने निदर्शनास आणले होते, परंतु यावर कोणतीही कृती झाली नाही. यामुळे सगळयात जास्त नुकसान झालेल्या कोतवली गावाच्या लोकांना त्यांनी विनंती करून सुध्दा लोटे अभ्यास गटामध्ये समाविष्ट केले गेले नाही. श्री. सचिन आंब्रे, उपसभापती, खेड पंचायत समिती आणि लोटे अभ्यास गटाचे सभासद यांनी लोटे अभ्यास गटाचे काम पूर्णपणे असमाधानकारक आहे असे नमूद केले. यानंतर 7 ऑक्टोबर रोजी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक झाली. या बैठकीत मला सांगितले गेले की, रत्नागिरी जिल्हा पर्यावरणीय समिती स्थापन करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे, परंतु प्रत्यक्षात अशी समिती अस्तित्वात नाही.

एकूण, मुंबई येथे 30 सप्टेंबर 2010 ला महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत जे सांगण्यात आले, त्यात आणि जमिनीवर काय चालले आहे यात मोठी तफावत होती. यानंतर असेही समजले

की, बऱ्याचश्या प्रकल्पांबद्दल जरी जनसुनावण्या झाल्या, तरी लोकांच्या भावनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले आहे. लोक रनपार, रत्नागिरी येथील फिनोलेक्स (1000 मेगावॅट) च्या औष्णिक वीज प्रकल्पाच्या तसेच जैतापूर, राजापूर तालुका येथील अणुविद्युत केंद्राच्या (1600 मेगावॅट x 6) पूर्ण विरोधात होते. पण त्यांच्याशी काहीही विचार विनिमय न करता हा विरोध डावलण्यात आला आहे. तसेच, कळणे गावातील खाणीसंबंधी पहिली सुनावणी 20 सप्टेंबर 2008 रोजी आयोजित केली होती. यावेळी EIA मराठीतून उपलब्ध नसल्याने सुनावणी पुढे ढकलली गेली. मराठी EIA उपलब्ध झाल्यावर 11 ऑक्टोबर 2008 रोजी ही सुनावणी झाली. या सुनावणीच्या वेळी 6 ऑगस्ट 2006 चा ग्रामपंचायतीचा एकमताने संमत केलेला खाणकाम विरोधी ठराव मांडला गेला आणि अनेक प्रश्न उपस्थित केले गेले:

1) कळणे नदीचे प्रदूषण आणि त्याचे चांडेल, गोवा येथील पाणी पुरवठयाच्या योजनेवर होणारे दुष्परिणाम
2) कळणे नदीवरील पाण्यावर अवलंबून असणाऱ्या फलोत्पादनावरील दुष्परिणाम

ह्या सुनावणीनंतर गावकऱ्यांना सुनावणीचे संक्षिप्त इतिवृत्त अपेक्षित कालावधीत मिळाले नाही. हे इतिवृत्त तब्बल 57 दिवसांनंतर उपलब्ध केले गेले. खाणकामाला एकमताने विरोध होऊन सुध्दा महाराष्ट्र सरकारने 17 मार्च 2009 रोजी खाणकामास पर्यावरणीय परवानगी दिली. शिवाय, रत्नागिरी तालुका पंचायत समितीबरोबरच अनेक ग्रामपंचायती आणि पंचायत समिती यांच्या पर्यावरणीय ठरावांकडे राज्य सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. यावरून स्पष्टच दिसते की, स्थानिक लोकांना पर्यावरण संरक्षण, व्यवस्थापन आणि देखरेख यामध्ये काहीही भूमिका देण्यात आलेली नाही.

## संवेदनशील परिसर क्षेत्र

संवेदनशील परिसरक्षेत्र (Ecologically Sensitive Areas) ही एक नवी, महत्वाची संकल्पना आहे. पश्चिम घाटावर अशी संवेदनशील परिसर क्षेत्रे सुचवणे हे पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाचे एक उद्दिष्ट आहे. संवेदनशील परिसर क्षेत्र ही संकल्पना राष्ट्रीय उद्यानासारख्या संरक्षित प्रदेशाहून वेगळी आहे.

साधारणतः अशा संरक्षित प्रदेशात कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप अपेक्षित नसतो. अर्थात् प्रत्यक्षात तळी बांधणे, पर्यटन यांसारख्या गोष्टी राष्ट्रीय उद्यानातही सुरू असतातच. पण संवेदनशील परिसर क्षेत्रात मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात असू शकतो. उदाहरणार्थ, संपूर्ण डहाणू तालुका हा संवेदनशील परिसर ecofragile क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आला आहे. तेथे एक औष्णिक वीजनिर्मिती केंद्र, आणि चिक्कूची बागायत आहे. तेव्हा संवेदनशील परिसर क्षेत्र हे असे क्षेत्र आहे की जेथे १९८६च्या पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार जे जे सयुक्तिक असतील ते ते निर्बंध लागू करता येतात. पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाचा ही संकल्पना लोकाभिमुख पध्दतीने - पायाकडून कळसाकडे जात - राबवण्याचा मानस आहे. आमचा गट सुचवतो आहे की, कोणत्या टापूस संवेदनशील ठरवावे, तेथे काय पध्दतीने निर्बंध लागू करावेत हे सगळे ठरवण्यात स्थानिक समाजांनी महत्वाची भूमिका बजवावी. जोडीला शास्त्रज्ञ, इतर तज्ञ हेही आपल्या सूचना देतीलच. पण अग्रक्रमाने स्थानिक लोकांच्या इच्छा - आकांक्षानुसार हे कार्यक्रम राबवावेत.

सध्या रत्नागिरी - सिंधुदुर्गात संवेदनशील परिसरक्षेत्र हा विषय गाजतो आहे. इथल्या अनेक ग्रामसभांनी- असनिये, कुंब्रख, मांतुर्ली, तलकट, झोंबळे, कोळझर, शिरवळ, उगडे कळणे, भिकेकोनळ, कुंभवडे, खाडपडे, भेकुर्ली, पाडवेमाजगाव, भालाव, तांबोली सारमळे, निवाळी, दाभिळ, ओतवणे, कोणशी, फुकेरी, धारपी, उडेली, केसरी-फांसवडे (तालुका - सावंतवाडी/दोडामार्ग) आमचे क्षेत्र हे संवेदनशील परिसरक्षेत्र म्हणून घोषित करावेत, असे ठराव एकमताने मंजूर केले आहेत. मला 9 ऑक्टोबर 2010 रोजी यांपैकी बऱ्याचश्या गावांना भेट द्यायचा योग आला आणि पश्चिम घाट अभ्यास समितीच्या मते संवेदनशील परिसर क्षेत्र म्हणजे काय याची चर्चा करण्याची संधी मिळाली. कर्नाटकातील कोडगू जिल्ह्यातील पर्यावरणवादी संस्थांनी आपला सर्व जिल्हा संवेदनशील परिसरक्षेत्र म्हणून जाहिर करावा अशी मागणी केली आहे. उलट शेजारच्या कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेने मोठया बहुमताने आमच्या जिल्ह्यात कोणतेही संवेदनशील परिसरक्षेत्र नको आहे असा ठराव मंजूर केला आहे.

३ जानेवारी २०११

संवेदनशील परिसरक्षेत्र ही संकल्पना आहे तरी काय? 1986 साली मंजूर झालेल्या भारतीय पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार कोणत्याही संवेदनशील क्षेत्रात भारत सरकारला तेथील पर्यावरणाचे संरक्षण करण्यास सयुक्तिक असे निर्बंध लागू करता येतात. या कायद्याचा वापर करून आतापर्यंत महाराष्ट्रात मुरूड-जंजीरा, डहाणू तालुका, माथेरान व महाबळेश्वर - पाचगणी हे चार टापू संवेदनशील परिसरक्षेत्र म्हणून जाहीर केले गेले आहेत. इथल्या पर्यावरणाचे रक्षण व्हावे ह्याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही, पण हे टापू असे संवेदनशील म्हणून घोषित करावे हे कोणी ठरवावे, तेथे कोण-कोणत्या मानवी हस्तक्षेपांचे नियमन व्हावे, इतर पर्यावरण, पोषक उपक्रम काय असावेत ह्याबद्दल अनेक मतप्रवाह आहेत.

आतापर्यंत आपण ग्रामसभा व इतर पंचायती राज्य संस्थांना व नगरपालिका - महानगरपालिकांना 73 व 74 व्या घटनादुरूस्तीनुसार नैसर्गिक संसाधनांचे नियोजन, नियमन, पुनर्जीवन करण्याचे अधिकार दिले आहेत. 2002 च्या जैव विविधता कायद्यानुसारही लोकांना, स्थानिक संस्थांना अनेक अधिकार दिले गेले आहेत. परंतु ह्याची अंमलबजावणी होत नाही. अजूनही सारे "चिंचेच्या पानावर उभविले देऊळ, आधि कळस मग पाया रे" ह्या भारूडातल्या ओळींप्रमाणे सारे कळसाकडून पायाकडे चालले आहे. ह्या व्यवस्थेत झालेली सारी उभारणी डगमगते आहे. संवेदनशील परिसरक्षेत्राची उभारणी करताना माथेरानात स्थानिक जनतेला विश्वासात न घेता लादलेल्या निर्बंधामुळे ह्याबाबत असमाधान आहे. नुकतेच कोल्हापूरातही वनविभागाने अभयारण्यांच्या आसमंतात बनणाऱ्या संवेदनशील परिसरक्षेत्राच्या बाबत असेच अयोग्य निर्बंध सुचवले आहेत (चौकट १). उदाहरणार्थ, संवेदनशील प्रदेशात कोणतेही कृत्रिम लाईट्स वापरले जाणार नाहीत. याचा अर्थ काय? रस्त्यावर दिवे लावले जाणार नाहीत का संपूर्ण प्रदेश रात्री अंधारात राहील? आणि संवेदनशील क्षेत्रात कोणतेही उद्योगधंदे उभारले जाणार नाहीत याचा अर्थ काय? याचा अर्थ पिठाच्या गिरण्यांना सुध्दा बंदी का? असे वनविभागाचे निर्बंध पाहूनच कोल्हापूर जिल्हा परिषदेने आम्हाला ही भानगड नकोच असे ठराव केला आहे.

चौकट १: **राष्ट्रीय उद्यान / अभयारण्य क्षेत्रापासून 10 कि.मी. अंतरावरील इको सेन्सीटीव्ह क्षेत्र म्हणून जाहीर करण्याबाबत.**

- केंद्र शासनाने भारतीय वन्यजीव मंडळाने 2002 मध्ये ठरविल्यानुसार प्रस्तावाची मागणी केली.
- याबाबतची कार्यवाही 2004 पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते.

इको सेन्सीटीव्ह झोनची व्याख्या करण्यात आली नाही. तरी पर्यावरण संरक्षण कायदा 1986 च्या कलम 3 उपकलम 2 (5) अंतर्गत जाहीर करणे आहे. या अंतर्गत प्रामुख्याने पर्यावरणाचे संरक्षण करणे अभिप्रेत आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्दयांचा समावेश आहे.

1. अधिवासास धोका
2. पर्यावरणाचे प्रदूषण
3. मनुष्य आणि वन्य प्राण्यांच्या जिवीतास धोका
4. परिस्थिती संवेदनशील
5. कारखान्यांमधून पर्यावरण प्रदूषण होणारे पदार्थ सदर क्षेत्रात टाकत असल्यास
6. अशा अन्य क्रिया किंवा प्रक्रिया ज्यामुळे वन्यप्राणी किंवा वनस्पतींच्या आश्रयस्थळास प्रदूषणाद्वारे अथवा अवनत करण्याचा किंवा अस्तित्व नष्ट करण्याचा धोका निर्माण होईल.

इको सेन्सीटीव्ह झोनच्या एकूण 10 कि.मी. पैकी अभयारण्यालगतचे 1 कि.मी. क्षेत्र हे बफर झोन असेल. यामध्ये कोणत्याही प्रकारची बांधकामे करावयाची नाहीत. बफर झोन हा मोकळा व हरीत राहील.

- इको सेन्सीटीव्ह झोनच्या क्षेत्रात ध्वनीप्रदूषण करावयाचे नाही.
- इको सेन्सीटीव्ह झोनच्या क्षेत्रात कृत्रिम लाईट योजना करावयाची नाही.
- इको सेन्सीटीव्ह झोनच्या क्षेत्रात औद्योगिक कारखाने असू नयेत.
- इको सेन्सीटीव्ह झोनच्या क्षेत्रात दगडखाण व खनिज उत्खनन करता येणार नाही. तसेच नवीन प्रस्तावना मान्यता मिळणार नाही.
- इको सेन्सीटीव्ह झोनच्या क्षेत्रात खाजगी किंवा महसूल विभागातून वृक्षतोड लिल्हाधिकारी यांचे परवानगीशिवाय करता येणार नाही.
- नैसर्गिक वारसा जपणे आवश्यक राहील. तसेच धबधबे, गुहा इत्यादीमध्ये कोणताही बदल करावयाचा नाही.
- नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या वनस्पतींचे जतन करावे.
- मानवनिर्मित वारसा जपणाऱ्या वास्तू-किल्ले इत्यादी जतन करावे.
- औद्योगिक वसाहती किंवा रहिवासासाठी नैसर्गिक पाणी साठयांच्या बेसुमार वापर करता येणार नाही. तसेच पाण्याचे प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

- प्लॅस्टिक वापरावर बंदी राहील.
- डोंगर उतारावर बांधकाम करता येणार नाही.
- सांडपाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक राहील.
- घनकचरा जाळून प्रदूषण करता येणार नाही.
- वाहनापासून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण राहील.

प्रणव सेन यांच्या समितीने कोणत्या निकषावर संवेदनशील परिसरक्षेत्र घोषीत करावे याबाबतचा अहवाल 2000 साली सादर केला. त्यात समृध्द जैवविविधता, भरपूर पर्जन्यमान, उभे डोंगर उतार, नद्यांचे उगम अशांवर आधारित विविध निकष आहेत. रत्नागिरी - सिंधुदुर्ग सारख्या "राष्ट्रदेवीचे निसर्ग निर्मित केवळ नंदन वनाला" यातले अनेक निकष लागू पडतात. त्यानुसार हे दोनही जिल्हे दहा वर्षांपूर्वीच संपूर्णतया संवेदनशील परिसरक्षेत्र म्हणून ठरवले जायला हवे होते. पण असे झाले नाही, यामागचे एक कारण असे की प्रणव सेन समितीने अशा संवेदनशील क्षेत्रांचे व्यवस्थापन कसे करावे ह्याबाबत काहीही मांडणी केलेली नाही.

ही संकल्पना पुढे राबवण्यास संवेदनशील क्षेत्रांचे व्यवस्थापन कसे केले जावे ह्याबाबत स्पष्टता यायला हवी. पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाच्या प्रतिपादनानुसार अशा व्यवस्थापनाबाबत ग्रामसभांचा, मोहल्ला सभांचा, ग्रामपंचायतींचा, पंचायत समित्यांचा, जिल्हा परिषदांचा नगरपालिकांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण हे व्यवस्थापन सरसकट, काहीतरी ताठर निर्बंध लागू करून होणे अनिष्ट आहे. प्रत्येक ठिकाणी स्थानिक परिस्थितीला अनुरूप असेच निर्बंध, उपक्रम ठरवले गेले पाहिजेत. उदाहरणार्थ, संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा हा संवेदनशील क्षेत्र घोषित करावा असे ठरवल्यास, सर्व जिल्ह्यात प्लास्टिकचा उपयोग करू नये असा निर्बंध अवश्य लागू करता येईल. जोडीला सर्वच स्थानिक ग्रामपंचायती व नगरपालिकांना जैववैविध्य कायद्याप्रमाणे संग्रहण शुल्क आकारण्याचा अधिकार ताबडतोब मिळावा असाही आग्रह धरता येईल. पण जिल्ह्यात एकही हॉटेल चालवू नये असा निर्बंध लावणे जमणार नाही. उलट समुद्र किनाऱ्यावरच्या एखाद्या पंचायतीत, येथील क्षेत्रात पर्यटकांसाठी घरगुती पाहुणचाराच्या विशेष सुविधा निर्माण करण्यास उत्तेजन द्यावे, व एकही व्यापारी हॉटेलला परवानगी देऊ नये असा निर्बंध लावणे

सयुक्तिक ठरू शकेल. संपूर्ण जिल्ह्यात अतीव प्रदूषक उद्योगधंदे नकोत असे ठरवता येईल. पण एखाद्या ग्रामापंचायतीत इथे केवळ शेती बागायती उत्पादनांवर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे हवेत, इतर कोणतेही नकोत असे ठरवता येईल. ह्याखेरीज अशा संवेदनशील परिसर क्षेत्रातील शेतकऱ्यांना गावरान वाणांचे जतन करण्यासाठी राष्ट्रीय जनुक निधीतून खास अनुदान देता येईल; तसेच भारताच्या हवामान बदलाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी आखलेल्या योजनेतून शेतजमिनीतील सेंद्रीय अंश वाढवून कार्बनची साठवणूक करण्याबद्दल अनुदान देता येईल.

असे सगळे नियोजन प्राधान्याने स्थानिक पातळीवर व्हावे म्हणून आमचा तज्ञ गट लोकांना आवाहन करत आहे की आपण आपापल्या क्षेत्राला अनुरूप असे पर्यावरणाला पोषक व लोकाभिमुख असे काय काय निर्बंध - उपक्रम हवेत हे सुचवावेत. ह्या सूचना कमी जास्त तपशीलात असू शकतील उदाहरणार्थ काही ग्रामसभा काहीही खाणी नकोत एवढेच सुचवू शकतील, इतर जास्त बारकाव्यात जाऊन उभ्या चढावर 30 फूटांहून रुंद रस्ते नकोत किंवा वहाळांना अपाय होणारे कोणतेही बांधकाम नको; काजूबोंडावर व वनौषधींवर आधारित उद्योग हवेत; खाजगी जंगलांची अभिवृध्दि करायला हवी; नारळ-पोफळीच्या झावळयांवर आधारित सुधारित चुली हव्यात; स्थानिक देवरहाटीला पूर्ण संरक्षण हवे अशा अनेक सूचना देऊ शकतील. समुद्रतीराजवळील ग्रामपंचायती खाडीत व उथळ समुद्रात यांत्रिक मासेमारीला बंदी असावी, स्थानिक युवकांसाठी स्नॉर्कलिंग व स्कूबा डायव्हींगच्या प्रशिक्षणासाठी खास सुविधा निर्माण करावी, मत्स्योत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना खास प्रोत्साहन द्यावे अशा धर्तीच्या सूचना करू शकतील.

## विकासाची वाटचाल योग्य दिशेने होत आहे काय हे ठरविण्यात स्थानिक लोकांना नीट सहभागी करून घेतले आहे काय?

अखेर साऱ्या विकासाचे उद्दिष्ट काय? लोकांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे आयुष्य अधिक समाधानकारक घडवणे. अर्थात्च ह्या विकासयोजना आखण्यात लोकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. परंतु, आज अशी परिस्थिती आहे की, “आम आदमी”ला डावलून दुसरेच मुठभर लोक कोटयवधी रूपये कसे खर्च

करावे हे ठरवत आहेत. केवळ पैसे खर्च करून कुठलेच प्रश्न सुटत नाहीत, हे तर अगदी उघड आहे. तेव्हा, ज्या लोकांच्या विकासासाठी पैसा खर्चिला जाणार आहे, त्या लोकांनीच तो कसा वापरावा हे ठरवावे, हेच श्रेयस्कर आहे. ह्यातूनच लोकांसाठी चांगल्या योजना आखल्या जातील आणि पैशाचा योग्य वापर होईल. म्हणूनच आपण घटनेत ७३वी व ७४वी दुरुस्ती करून पैसा कधी, कुठे आणि कशावर खर्च करावा, ह्या निर्णयप्रक्रियेत महत्वाची जबाबदारी ग्रामसभा, शहरी भागातील मोहल्ला सभा, तसेच ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा आणि नगरपालिका यांनी स्वीकारावी असे ठरवले आहे.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात याचे निश्चितपणे पालन होत नाही. लोक सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म जल विद्युतप्रकल्पांपासून होणाऱ्या ऊर्जानिर्मितीबद्दल, तसेच सावंत समिती प्रस्तावित मासेमारी बंदरांबद्दल उत्सुक आहेत. परंतु याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून औष्णिक आणि अणु-विद्युतनिर्मिती, तसेच अशा लोकांना नको असलेल्या प्रकल्पांसाठी बंदर उभारणी याच गोष्टींवर भर दिला जात आहे.

## आजच्या विकास नीतीतून शाश्वत विकासाकडे वाटचाल होत आहे काय?

याचे उत्तरही नकारार्थी आहे. विकासाची धोरणे आखताना कोणत्याही प्रदेशाच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा सुव्यवस्थित वापर करून मग त्यावर इतर डोलारा उभारणे हे शहाणपणाचे आहे. ह्या दृष्टीने विचार करून रत्नागिरी- सिंधुदुर्ग जिल्ह्यांत आमराया, रोहयोद्वारा केलेली काजू लागवड, पर्यटन यांवर भर देणारी विकास प्रक्रिया आखली जात होती; त्याला आधार म्हणून रत्नागिरी प्रादेशिक विकास आराखडा, आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी उद्योगांची सुयोग्य स्थलनिश्चिति दर्शविणारे मानचित्र तयार केले होते. परंतु आता विकास धोरणांची दिशा अचानकपणे बदलत आहे. आधीची विचारपूर्वक आखलेली चौकट बाजूला ठेवून जमीन, पाणी, व इतर साऱ्या संसाधनांचा वापर करणे सुरू झाले आहे. ह्यातून शाश्वत विकास होणे अशक्यप्राय आहे.

३ जानेवारी २०११

## सत्ताधाऱ्यांना जमिनीवर काय चालू आहे ह्याची जाणीव आहे काय?

सत्ताधाऱ्यांना जमिनीवर काय चालू आहे ह्याची अगदी अंधुकच कल्पना आहे असे दिसते. यामुळेच मला रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी जिल्हा पर्यावरणीय समिती अस्तित्वात आहे आणि लोटे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा लोटे अभ्यास गट क्रियाशील आहे असे सांगितले गेले. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती अगदीच वेगळी होती.

## लोकांचे नागरी हक्क जपले जात आहेत काय?

रत्नागिरी – सिंधुदुर्गच्या नागरिकांना केवळ पर्यावरणाच्या संवर्धनात, किंवा विकासप्रक्रियेची दिशा ठरवताना काहीही भूमिका देण्यात आलेली नाही, एवढेच नाही, तर आज त्यांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली होताना दिसत आहे. ह्या अभ्यास दौऱ्यादरम्यान माझ्या आयुष्यात प्रथमच मला लोकांशी खुलेपणे बोलणे अशक्य आहे असा अनुभव आला. ८ ऑक्टोबर २०१०च्या सकाळी मला रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून एक धक्कादायक बातमी मिळाली: त्यांनी मुंबई पोलीस कायदा 1951 [Sec. 37(1)(3)] लागू केला होता; या कायद्यान्वये 5 पेक्षा जास्त लोक एकत्र जमवण्यावर निर्बंध होता, तेव्हा मला लोकांबरोबर खुली चर्चा करणे अशक्य होते. माझ्या महितीप्रमाणे तोवर रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची प्रकल्पविरोधी हिंसक आंदोलने झाली नव्हती, तरीही अशा प्रकारचे निर्बंध सतत लादले जाऊन, लोकांची गळेचेपी केली जात होती. तसेच, अशा अनेक प्रकल्पांच्या जनसुनावणीच्या वेळी एकमताने केलेला घट्ट विरोधही बाजूला सारला जातो असे चित्र होते.

तांबोळी गावाच्या लोकांनी मला सांगितले की, साधारण चार वर्षांपूर्वी त्यांना अचानक कळले की, त्यांना न कळवता खाणकाम हे त्यांच्या जमिनीवरील इतर हक्कांमध्ये समाविष्ट केलेले आहे. वस्तुतः हे त्यांच्या संमतीनेच व्हायला पाहिजे होते. यामुळे प्रचंड खळबळ माजली. 2007 मध्ये याच्या विरोधात या लोकांनी आमरण उपोषण केले, तेव्हा ही चूक दुरुस्त केली गेली. शिवाय, लोकांची दिशाभूल करून त्यांच्या इच्छेविरुध्द अनेक प्रकल्पांसाठी जागा खरीदली, अथवा संपादित केली गेली आहे. लोकांनी ’इकोटुरिझम

रिसॉर्ट' येईल म्हणून विकलेल्या जमिनीवर PTIANA ही कंपनी आता औष्णिक वीज केंद्र उभारणार आहे. फिनोलेक्सने त्यांची जाहीर केलेली उत्पादने पाईपपासून रेझीनपर्यंत आणि आता कोळश्यापासून वीजनिर्मिती इथपर्यंत बदलत नेली. वर फिनोलेक्स आता मासेमाऱ्यांचा समुद्रावरील परंपरागत हक्क अमान्य करत आहे. एन्रॉन बंद करून RGPPL सुरू केले, आता ते एन्रॉनने आधी स्थानिक लोकांना दिलेली आश्वासने पाळण्यास तयार नाही.

## समालोचन

अनेक कोकणपुत्रांनी देशाची लक्षणीय सेवा बजावली आहे. कोकण हे भारतीय असंतोषाचे जनक असे बिरुद मिळालेले लोकमान्य टिळक, भारतरत्न प्राप्त झालेले धोंडो केशव कर्वे, विनोबा भावे आणि पांडुरंग वामन काणे यांची जन्मभूमी होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वजांचे गावही कोकणात आहे आणि कोकण त्यांची कर्मभूमी आहे. महाराष्ट्राच्या ह्या सर्वाधिक सुशिक्षित प्रदेशातील लोक पर्यावरणाला जपत आपला विकास कसा व्हावा हे ठरवण्यास पूर्णतः समर्थ आहेत. ह्यांनीच प्राचीन काळापासून देवरायांच्या रूपात आपल्या पर्यावरणाला, आपल्या जैवविविधतेल जपले आहे. मला लोकांनी हजारो पत्रे लिहून इथली निसर्ग संपत्ती टिकवलीच पाहिजे असा आग्रह केला आहे. आता हे प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण त्यांचे हात बळकट केले पाहिजेत.

लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" असे ठणकावल्याला शंभर वर्षे होऊन गेली. आपण स्वातंत्र्य मिळविले आणि प्रगतिपथावर वाटचाल करू लागलो. आता गरज आहे विकास म्हणजे काय याचे चिंतन करण्याची. “विकास म्हणजे काय” या विषयाचे मोठे मार्मिक विवेचन केले आहे अर्थशास्त्राचे जगन्मान्य अभ्यासक, अमर्त्य सेन यांनी आपल्या, 'डेव्हलेपमेंट एज फ्रीडम' ह्या पुस्तकात. अमर्त्य सेन म्हणतात की विकास म्हणजे नुसती आर्थिक उलाढालींत वाढ नव्हे, अथवा दरडोई उत्पन्नात वाढ होणे नव्हे. जरी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांचे आर्थिक उत्पन्न जास्त असले तरी त्यांचे आयुष्यमान श्रीलंकावासी आणि केरळवासीयांपेक्षा कमीच आहे. तेव्हा सेन म्हणतात विकास म्हणजे स्वातंत्र्य, विकास म्हणजे बंधमुक्ती. अनेक पाशांतून सोडवणूक. प्रदूषणापासून विमोचन, निरक्षरतेच्या मगरमिठीतून मोकळीक, बेरोजगारीच्या जखडणूकीतून सुटका, दुसऱ्यांनी केलेले निर्णय मुकाट्याने मान्य

करण्याच्या सक्तीपासून मुक्ती. ते प्रचंड अभ्यासाच्या, काळजीपूर्वक संकलित केलेल्या महितीच्या आधारे दाखवून देतात की ह्या स्वातंत्र्यांमुळे आर्थिक विकासाचा वेग मंदावतो असे मुळीच नाही. उलट अशा मोकळ्या वातावरणातच अर्थव्यवस्था भरभराटीला येते. अर्थात् ते हे ही ठासून मांडतात की आर्थिक विकास हे केवळ साधन आहे, साध्य नाही. आपले उद्दिष्ट लोकांच्या सर्वंकष स्वातंत्र्याचा विकास हेच असले पाहिजे.

मला वाटते की, रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा विकास अमर्त्य सेन यांनी सुचवल्याप्रमाणेच व्हावा. या विकासाबद्दलचे निर्णय फक्त तज्ञांनी घेऊ नयेत. अशाच तज्ञांद्वारे शेकडो असमाधानकारक पर्यावरणीय प्रभावाची परीक्षणे केली गेली आहेत, आणि नंतरच्या मूल्यांकनांत अशा सदोष परीक्षणांना मान्यता दिली गेली आहे. अर्थात्च विकासाबद्दलच्या निर्णयप्रक्रियेत तज्ञांची भूमिका महत्वाची राहील, पण ती सकारात्मक असावी. त्यांनी लोकांना जरूर ती माहिती पुरवावी, चांगला सल्ला द्यावा, पण लोकांवर काहीही लादू नये. तसेच विकासाबद्दलच्या निर्णयप्रक्रियेत शासकीय यंत्रणेची भूमिकाही महत्वाची राहील. पण आज हीच शासकीय यंत्रणा प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यात कुचकामी ठरली आहे; ह्याच शासकीय यंत्रणेने लोकांची मुस्कटदाबी केली आहे. तेव्हा ही पद्धती बदलून शासनाने पण एक सकारात्मक भूमिका घ्यावी. शासनाने लोकांना जरूर ती माहिती पुरवावी, चांगला सल्ला द्यावा, लोकांना अंमलबजावणीत सर्व प्रकारची मदत करावी, पण शासकीय यंत्रणेनेही लोकांवर काहीही लादू नये.

लोकांच्या हाती सर्व सूत्रे असलेल्या, लोकांसाठी राबवल्या जाणाऱ्या लोकशाहीवर माझा गाढ विश्वास आहे. म्हणून मला वाटते की पर्यावरण प्रेमिकांचे सारे प्रयत्न लोकांना पर्यावरणाचे संगोपन करण्यास सक्षम करण्यावर केन्द्रित असावे. पर्यावरण आणि वन मंत्रालयाने ह्याच उद्दिष्टावर आपले लक्ष केन्द्रित करावे अशी माझी शिफारस आहे. आमचा पश्चिम घाट परिसर तज्ञ गट यासाठी जरूर ती मदत आनंदाने मदत करेल.

## परिशिष्ट १: रत्नागिरी जिल्ह्यात लोकांच्या प्रदूषण अथवा प्रकल्प विरोधी निदर्शनांच्या संदर्भात मुंबई पोलीस कायदा, १९५१, कलम ३७(१) (३): जमावबंदी याचा वापर केल्याची काही उदाहरणे

| अनुक्रम. | तारीख | कारण | दिवस |
|---|---|---|---|
| 1 | 28.8.07 to 11.9.07 | फिनोलेक्सच्या रनपाल प्रकल्पाचा निषेध | 15 |
| 2 | 9.12.07 to 11.12.07 | जिंदालच्या जयगड प्रकल्पाचा निषेध | 3 |
| 3 | 22.3.08 to 4.4.2008 | फिनोलेक्स कंपनीचा निषेध | 14 |
| 4 | 5.4.08 to 19.4.08 | फिनोलेक्स कंपनीचा निषेध | 15 |
| 5 | 16.4.08 to 30.4.08 | धोपावे प्रकल्पाचा निषेध | 15 |
| 6 | 28.4.08 to 12.5.08 | फिनोलेक्स कंपनीचा निषेध | 15 |
| 7 | 19.6.08 to 30.6.08 | लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा निषेध | 12 |
| 8 | 15.7.08 to 30.7.08 | १७ गाव संघर्ष समितीद्वारे लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा निषेध | 16 |
| 9 | 2.8.08 to 2.8.08 | मनसेद्वारा लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा निषेध | 1 |
| 10 | 6.8.08 to 6.8.08 | पिन्टोकी कंपनीचा खेड शिवसेनेद्वारा निषेध | 1 |
| 11 | 19.8.08 to 31.8.08 | लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा स्थानिक निषेध | 13 |
| 12 | 17.9.08 to 30.9.08 | पिन्टोकी कंपनीचा निषेध | 14 |
| 13 | 1.2.09 to 10.2.09 | लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा शिवसेना व इतरांद्वारे निषेध | 10 |
| 14 | 12.2.09 to 26.2.09 | लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा शिवसेना व इतरांद्वारे निषेध | 15 |
| 15 | 23.5.09 to | १७ गाव संघर्ष समितीद्वारे | 10 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 1.6.09 | लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा निषेध | |
| 16 | 06.06.09 to 15.6.09 | १७ गाव संघर्ष समितीद्वारे लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा निषेध | 10 |
| 17 | 18.6.09 to 28.6.09 | १७ गाव संघर्ष समितीद्वारे लोटे येथील रासायनिक प्रदूषणाचा निषेध | 11 |
| 18 | 27.10.09 to 27.10.09 | जैतापूर-माडबन भूसंपादनासंबंधित निषेध | 1 |
| | | एकूण दिवस | 191 |